# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक १९/०८/२०१५

## सायं ४.०० वा.

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. ०९/०७/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. ०९/०७/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक - नरेंद्र पाटील सुचक - वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रश्नोत्तरे</td><td>
<table>
<tr><td>१</td><td>१९/८/२०१५</td><td>श्री. किरण पुरुषोत्तम भोईर</td><td>महागरपालिकेने आतापर्यंत किती टी.डी.आर. दिलेले आहेत व कोणकोणत्या इमारतींना?</td><td>मा. उपसंचालक नगररचना यांना दि. २३/०७/२०१५</td></tr>
<tr><td>२</td><td>१९/८/२०१५</td><td>श्री. किरण पुरुषोत्तम भोईर</td><td>सा २०१४ पर्यंतच्या अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार १३६५ कोटी ४७ लाख ४५ हजार अनुदान उत्पन्न आले होते ते अनुदानित उत्पन्न कोणत्या शासनाच्या प्रयोजनातुन आले आहे? त्यापैकी मंजुर झालेल्या अनुदानातुन किती प्रयोजन किंवा उद्दिष्ट साध्य झाली आहेत.</td><td>१. मा. नगरअभियंता, - नगररचना दि. २३/७/२०१५<br>२. मा. मुख्य लेखाधिकारी दि. २४/७/२०१५</td></tr>
</table>
अनुमोदक - नरेंद्र पाटील सुचक - वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>३</td><td>शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव</td><td>
<table>
<tr><td>१</td><td>महाराष्ट्र शासन, स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालय, नगरविकास विभाग, मुंबई-२१</td></tr>
<tr><td>२</td><td>महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, न.वि.२०, मुंबई-३२ (शासन निर्णय)</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| ३ | महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई-३२ (शासन परिपत्रक) |
| ४ | महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई-३२ (शासन निर्णय) |
| ५ | महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई-३२ (शासन निर्णय) |

अनुमोदक - नरेंद्र पाटील सुचक - वृंदेश पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

---

४

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० सह कलम ३१-अ अन्वये मा. स्थायी समितीवर सोळा सदस्यांची नामनिर्देशाद्धारे नेमणुक करणे.**

**निर्णय :-** प्रस्तावनेत नमुद केलेनुसार, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्य नेमणुक करणेकामी बहुजन विकास आघाडी व अपक्ष गट यांनी गटनेत्यांमार्फत तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात संयुक्तपणे खालील सदस्यांचे नामनिर्देशनाद्धारे नेमणुक करणेकामी शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | पंकज भास्कर ठाकूर |
| २. | मनिषा जाधव |
| ३. | कांता अनंत पाटील |
| ४. | चंद्रकांत गोरिवले |
| ५. | मिलिंद घरत |
| ६. | उमेश दत्तात्रेय नाईक |
| ७. | लॉरेल डायस |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| ८. | प्रकाश रॉड्रीक्स |
| ९. | सुनिल आचोळकर |
| १०. | अब्दुल पटेल |
| ११. | नितिन दिनानाथ राऊत |
| १२. | छाया पाटील |
| १३. | समिर डबरे |
| १४. | किशोर गजानन पाटील |

वसई-विरार शहर विकास आघाडीच्या गटनेत्या यांनी तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात खालील सदस्याची नामनिर्देशनाद्धारे नेमणुक करणेकामी शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | प्रशांत दत्तात्रेय राऊत |

तसेच शिवसेनेचे गटनेता यांनी तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात खालील सदस्याची नामनिर्देशाद्धारे नेमणुक करणेकामी शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | धनंजय विठ्ठल गावडे |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० च्या अनुषांगिक तरतुदीनुसार १६ सदस्यीय स्थायी समितीवर नोंदणीकृत गटांकडून तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात वरील प्रमाणे १६ सदस्यांचे नेमणुकीची शिफारस प्राप्त झालेली आहे. सबब, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या १६ सदस्यीय स्थायी समितीवर खालील सदस्यांची नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|---|
| १. | ३१ | पंकज भास्कर ठाकूर |
| २. | ९९ | मनिषा जाधव |
| ३. | ४ | कांता अनंत पाटील |
| ४. | ८२ | चंद्रकांत गोरिवले |
| ५. | ४५ | मिलिंद घरत |
| ६. | ४८ | उमेश दत्तात्रेय नाईक |
| ७. | १११ | लॉरेल डायस |
| ८. | १०१ | प्रकाश रॉड्रीक्स |

| अ.क्र. | प्रभाग क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|---|
| ९. | ७५ | सुनिल आचोळकर |
| १०. | ४१ | अब्दुल पटेल |
| ११. | १०० | नितिन दिनानाथ राऊत |
| १२. | ३९ | छाया पाटील |
| १३. | ८४ | समिर डबरे |
| १४. | ५३ | किशोर गजानन पाटील |
| १५. | ३० | प्रशांत दत्तात्रेय राऊत |
| १६. | ६३ | धनंजय विठ्ठल गावडे |

अनुमोदक - सुदेश चौधरी सुचक - पंकज ठाकूर

ठराव सर्वानुमते मंजुर

५

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० च्या अनुषांगिक तरतुदींनुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीवर एकुण सदस्य संख्या निश्चित करून कलम ३१ - अ चा विचार करून आवश्यक त्या सदस्यांची नामनिर्देशाद्वारे नेमणुक करणे.**

**निर्णय :-** वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवरील सदस्य संख्या १५ निश्चित करण्यास मान्यता देणेत येत असुन निश्चित केलेल्या सदस्य संख्याच्या प्रमाणात महानगरपालिकेतील नोंदणीकृत गटांकडून सदर समितीवर नामनिर्देशनाद्वारे सदस्य नेमणुकीकरीता बहुजन विकास आघाडी व अपक्ष गटाचे संयुक्तपणे खालील सदस्य नेमणुकीची शिफारस गटनेता यांचेकडून प्राप्त झाली आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | भारती प्रदिप देशमुख |
| २. | रंजना थालेकर |
| ३. | प्रतिभा सचिन पाटील |
| ४. | जयश्री किणी |
| ५. | शोभा मोरे |
| ६. | शुभांगी गायकवाड |
| ७. | उजमा पिरखान |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| ८. | अनिता यादव |
| ९. | विजया भोईर |
| १०. | पुष्पा जाधव |
| ११. | प्राची कोलासो |
| १२. | प्रज्ञा देसाई |
| १३. | संजय पिंगुळकर |
| | |

वसई-विरार शहर विकास आघाडीच्या गटनेत्या यांनी तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात खालील प्रमाणे एका सदस्याची नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करणेकामी शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | माया सुबोध चौधरी |

तसेच शिवसेनेचे गटनेता यांनी तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात खालील प्रमाणे एका सदस्याची नामनिर्देशाद्वारे नेमणुक करणेकामी शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्रीम. किरण उदय चेंदवणकर |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० च्या अनुषांगिक तरतुदींनुसार १५ सदस्यीय महिला व बालकल्याण समितीवर नोंदणीकृत गटांकडून तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात वरील प्रमाणे १५ सदस्यांचे रितसर नेमणुकीची शिफारस प्राप्त झ ालेली आहे. सबब, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या १५ सदस्यीय महिला व बालकल्याण समितीवर खालील सदस्यांची नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|---|
| १. | १७ | भारती प्रदिप देशमुख |
| २. | ३४ | रंजना थालेकर |
| ३. | २३ | प्रतिमा सचिन पाटील |
| ४. | ५ | जयश्री किणी |
| ५. | ६४ | शोभा मोरे |
| ६. | ५५ | शुभांगी गायकवाड |
| ७. | १०९ | उजमा पिरखान |
| ८. | ४६ | अनिता यादव |
| ९. | ८८ | विजया भोईर |
| १०. | १०२ | पुष्पा जाधव |
| ११. | १०८ | प्राची कोलासो |
| १२. | २० | प्रज्ञा देसाई |
| १३. | ११ | संजय पिंगुळकर |
| १४. | १८ | माया सुबोध चौधरी |
| १५. | ९२ | श्रीम. किरण उदय चेंदवणकर |

अनुमोदक - छाया पाटील सुचक - भारती देशमुख

ठराव सर्वानुमते मंजुर

| | | |
|---|---|---|
| ६ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समित्यांची रचना करणे.** | **ठराव :-** वरील प्रस्तावित केलेनुसार, वसई-विरार शहर महानगरपालिकेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २९ अ (१) नुसार महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने खालीलप्रमाणे संलग्न प्रभाग असलेल्या प्रभागांच्या मिळून |

प्रभाग समित्या स्थापन करणेस ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | प्रभाग समित्यांचे नाव | समाविष्ठ प्रभाग | एकूण |
|---|---|---|---|
| १. | A | ३,४,१३,१४,१५,१६,१७,२०,२९,३१,३२,३३,३४,३५,३६ | १५ |
| २. | B | २५,२६,२७,२८,३०,३७,३८,३९,४७,४९,५०,५२,५४ | १३ |
| ३. | C | १,२,६,७,८,९,१०,११,१२,१८,१९,२१,२२,२३,२४ | १५ |
| ४. | D | ४८,५१,६२,६३,६४,६६,६९,७०,७८,७९,८०,८३,८६,८७,९२ | १५ |
| ५. | E | ५३,५५,५६,५७,५८,५९,६०,६१,६५,८१,८२,८४,९४ | १३ |
| ६. | F | ५,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,६७,६८,७१,७२,७३ | १३ |
| ७. | G | ७४,७५,७६,७७,८८,८९,९०,९१,१०५,११५ | १० |
| ८. | H | ८५,९३,९५,९६,९७,९८,९९,१००,१०१,१०२,१०४ | ११ |
| ९. | I | १०३,१०६,१०७,१०८,१०९,११०,१११,११२,११३,११४ | १० |

अनुमोदक - वृंदेश पाटील        सुचक - नितीन राऊत

ठराव सर्वानुमते मंजुर

---

**७**

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम (३) च्या अनुषांगिक तरतुदींनुसार मा. वृक्षप्राधिकरणाची स्थापना करणे.**

**निर्णय :-** वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरण समितीवरील सदस्य संख्या १५ निश्चित करण्यास मान्यता देणेत येत असुन निश्चित केलेल्या सदस्य संख्याच्या प्रमाणात महानगरपालिकेतील नोंदणीकृत गटांकडून सदर समितीवर नामनिर्देशनाद्धारे सदस्य नेमणुकीकरीता बहुजन विकास आघाडी व अपक्ष गटाचे संयुक्तपणे खालील सदस्य नेमणुकीची शिफारस गटनेता यांचेकडून प्राप्त झाली आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | मार्शल लोपिस |
| २. | पंकज चोरघे |
| ३. | अजित नाईक |
| ४. | मनिष वर्तक |
| ५. | अमिता पापडे |
| ६. | विद्या पाटील |
| ७. | दिलीप गोवारी |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| ८. | दिशा घरत |
| ९. | शकुंतला शेळके |
| १०. | प्रफुल्ल पाटील |
| ११. | देवयानी धुमाळ |
| १२. | सुषमा लोपिस |
| १३. | प्रतिभा किशोर पाटील |
| | |

| | | |
|---|---|---|
| | | वसई-विरार शहर विकास आघाडीच्या गटनेत्या यांनी तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात खालील प्रमाणे एका सदस्याची नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करणेकामी शिफारस केलेली आहे.<br>अ.क्र. — सदस्यांचे नाव<br>१. — अतुल सांळुखे<br>तसेच शिवसेनेचे गटनेता यांनी तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात सदस्याऐवजी खालील व्यक्तीचे नामनिर्देशाद्वारे नेमणुक करणेकामी शिफारस केलेली आहे.<br>अ.क्र. — सदस्यांचे नाव<br>१. — श्री. विवेक कृष्णा पाटील<br>महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (प्रकरण - दोन) मधील कलम ३ पोटकलम (१) अन्वये १५ सदस्यीय वृक्षप्राधिकरण समितीवर नोंदणीकृत गटांकडून तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात वरील प्रमाणे १५ सदस्यांचे नेमणुकीची शिफारस प्राप्त झालेली आहे. पैकी शिवसेनेतर्फे वृक्षप्राधिकरणावर सदस्य म्हणुन नेमणुक करणेकामी श्री. विवेक कृष्णा पाटील यांची प्राप्त झालेली शिफारस ते महापालिका सदस्य नसल्याने, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (प्रकरण - दोन) मधील कलम ३ पोटकलम (१) चा विचार करता अमान्य करण्यात येत आहे. सबब, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या १५ सदस्यीय वृक्षप्राधिकरण समितीवर खालील १४ सदस्यांची नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करणेत येत आहे. |

| अ.क्र. | प्रभाग क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|---|
| १. | ३५ | मार्शल लोपिस |
| २. | ९४ | पंकज चोरघे |
| ३. | ३६ | अजित नाईक |
| ४. | १०६ | मनिष वर्तक |
| ५. | १०३ | अमिता पापडे |
| ६. | ११२ | विद्या पाटील |
| ७. | १ | दिलीप गोवारी |
| ८. | ७२ | दिक्षा घरत |

| अ.क्र. | प्रभाग क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|---|
| ९. | ९० | शकुंतला शेळके |
| १०. | ७३ | प्रफुल्ल पाटील |
| ११. | ७४ | देवयानी धुमाळ |
| १२. | १५ | सुषमा लोपिस |
| १३. | २२ | प्रतिभा किशोर पाटील |
| १४. | ६० | अतुल सांळुखे |
| १५. | | |
| | | |

अनुमोदक - वृंदेश पाटील सुचक - भारती देशमुख

ठराव सर्वानुमते मंजुर

| | | |
|---|---|---|
| ८ | **वृक्ष प्राधिकरण विभागाचे आवश्यक कामासाठी यंत्र सामुग्री व वाहन खरेदी करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** सदरचे प्रस्तावावर सभेत सविस्तर चर्चा करणेत आली. शहरातील महानगरपालिका मालकीच्या रस्त्यावरील त्याचप्रमाणे शहरातील नागरिक, सोसायटी यांच्या मागणी अर्जानुसार अनावश्यक वृक्षांच्या फांद्या छाटणे, धोकादायक वृश्रांच्या फांद्या छाटणे व इतर अनुषंगिक कामे करणे व शहरात महानगरपालिकेच्या वतीने लागवड करणेत आलेल्या वृक्षांना वेळोवेळी पाणी देणेसाठी सद्यस्थितीत स्वतंत्र वाहन उपलब्ध नसल्याने या कामी फांद्या छाटणेसाठी दोन हायड्रोलिक लॅडर वाहन व वृक्षांना पाणी देणेसाठी दोन छोटे पाण्याचे टॅंकर खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी जाहीर ई टेंडर नुसार निविदा प्रक्रिया करुन निविदा मागविणेस व सदरची निविदा प्रक्रिया मुख्य कार्यालयातील वाहन विभागातून पूर्ण करुन घेणेस ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - नितीन राऊत सुचक - वृंदेश पाटील<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ९ | **सन २०१५-१६ या वित्तीय वर्षासाठी शासनाचे धोरणानुसार जैव विविधता संवर्धन व व्यवस्थापन करणेकामी नाविण्यपुर्ण योजनांची आखणी करणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** उपरोक्त विषयाबाबत साधक बाधक चर्चा करणेत आली. जैविक विविधता कायदा २०१२ व महाराष्ट्र जैविक विविधता अधिनियम २००८ तसेच मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी याचिका क्र.१०७/२०१३ मध्ये दिलेल्या आदेशानुसार महापालिका स्तरावर जैविक विविधता व्यवस्थापन समिती स्थापन करुन तसे शासनास तातडीने कळविणे आवश्यक आहे.<br>जैव विविधता कायद्याचे तरतुदीनुसार वसई - विरार शहर महानगरपालिकेची जैविक विविधता व्यवस्थापन समिती गठीत करणेकामी आजची सर्वसाधारण सभा मा. महापौर महोदयांना सर्वाधिकार प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - भरत मकवाना सुचक - अब्दुल हक सुलेमान पटेल<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| १० | **वसई-विरार शहर महानगरपालिका शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धा २०१५ आयोजनाबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली, त्यानुसार युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध शालेय, महिला व इतर क्रीडा स्पर्धाचे आयोजन माहे जुलै २०१५ ते माहे डिसेंबर २०१५ या कालावधीत आयोजित करण्यांत येणार असल्याने सदरचा कार्यक्रम करणेंस आजची ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>तसेच युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध शालेय, महिला व इतर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी स्पर्धेच्या ठिकाणी टेबल, खुर्ची, मंडप, साऊंड सिस्टीम, फोटोग्राफरची, व्यवस्था करावी लागणार आहे. प्रत्येक स्पर्धेसाठी पंच, परिक्षक यांना मानधन द्यावे लागणार आहे. सदर स्पर्धेकरीता खालील बाबींवर खर्च होणार आहे. टेबल, खुर्ची, मंडप, साऊंड सिस्टीम, फोटोग्राफी, चहा, नास्ता, जेवण व बिसलरी पाणी, पंचाचे मानधन, ट्रॉफी, मेडल्स, प्रमाणपत्र, जिल्हा क्रीडा पुस्तिका छपाई, स्पर्धेकरीता लागणारे क्रीडा साहित्य, प्रथमोपचार साहित्य, बिस्किट, चॉकलेट, चुना तसेच इतर अन्य बाबींवर अंदाजित रक्कम रुपये २५ लक्ष इतका खर्च होणार पर्यंतच्या |

| | | |
|---|---|---|
| | | खर्चास आजची ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - वृंदेश पाटील सुचक - पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ११ | **वसई-विरार शहर महानगरपालिकच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी आवश्यक असलेले अधिकारी/कर्मचारी वर्ग तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्त करणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव / निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी आवश्यक असलेले कर्मचारी वर्ग तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करणेकामी आवश्यक पदनिर्मितीस व या पदांवर अधिकारी/कर्मचारी वर्ग नियुक्ती करणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (३) नुसार आवश्यक कर्मचारी वर्ग तात्पुरत्या स्वरुपात प्रत्येकी ६ महिन्यांसाठी नेमणुक करण्याचा अधिकार मा. आयुक्तांना असल्याने यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेची रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी आवश्यक असणारे तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी स्त्रीरोग तज्ज-०४ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. ५०,०००/- ते ५५,०००/-, बालरोग तज्ज- ०२ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. ५०,०००/- ते ५५,०००/-, भिषक-०४ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. ५०,०००/- ते ५५,०००/-, अस्थिरोग तज्ज - ०२ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. ५०,०००/- ते ५५,०००/-, शल्यचिकित्सक - ०२ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. ५०,०००/- ते ५५,०००/-, पॅथॉलॉजिस्ट- ०२ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. ५०,०००/- ते ५५,०००/-, रेडिओलॉजिस्ट - ०२ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. ५०,०००/- ते ५५,०००/-, भुलतज्ज-०२ ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. ५०,०००/- ते ५५,०००/- व एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी -६२ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. ४५,०००/-, बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी -२७ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. ३१,०००/-, पी.एच.एन.-०६ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. २४,०००/-, जी.एन.एम.-११८ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. १२,०००/- व ए.एन.एम-१९५ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. १२,०००/-, फार्मासिस्ट-३८ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. १४,०००/-, प्रयोगशाळा सहाय्यक - ३३ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. १३,०००/-, क्ष-किरण सहाय्यक- ०८ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. १३,०००/- व समुपदेष्टा-०८ पदे ही प्रत्येकी मानधन दरमहा रू. १४,०००/-, व शितसाखळी तंत्रज्ञ हे पद रू १३०००/- इतक्या मानधनावर वरीलप्रमाणे नमुद मानधनासह व यापेक्षा जास्तीच्या पदांची आवश्यकता |

| | | |
|---|---|---|
| | | असल्यास सदरची पदे वाढविणेस तसेच यापुढील ६ महिन्यांकरीता व तद्नंतरच्या ६ महिन्याकरीता उपरोक्त पद निर्मिती करणेस पद भरती करणेस व आवश्यक ती प्रक्रिया करून पुढील कार्यवाही करणेस व महानगरपालिकेमध्ये पुर्वी पासुन कंत्राटी पद्धतीने कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना या पदावर नियुक्ती कामी विहीत केलेली वयोमर्यादेची अट न ठेवणेस ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - संदिप पाटील सुचक - कन्हैया भोईर<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १२ | **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेस नविन आकृतीबंधानुसार अनुदान उपलब्ध होणेकामी प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता मिळणेबाबत.** | **<u>ठराव / निर्णय</u> :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मंजूर पाणी पुरवठा योजनेस शासन निर्णय क्रमांक नगरोत्थान-२०१४/प्र.क्र११९/नवि-३३ दि.२१/०८/२०१४ च्या निर्णयाप्रमाणे सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार शासनाचे ७०% (१८८.८५ कोटी ) अनुदान मंजूर होण्यासाठी सदर शासन निर्णयानुसार योजना पुर्ण होण्यासाठी विविध शासकीय विभागांच्या आवश्यक परवानग्या प्राप्त करण्यास लागणारा कालावधी लक्षात घेता मार्च,२०१६ पर्यंत योजाना पूर्ण होणार असल्याबाबतचे हमीपत्रासह आवश्यक प्रस्ताव शासनास पाठविण्यास या सभेची मंजूरी आहे. तसेच यासंबंधी पुढील सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना प्रदान करण्यात येत आहेत.<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - अब्दुल हक सुलेमान पटेल<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १३ | **वसई-विरार शहर महानगरपालिका सन २०१३-१४, सन २०१४-१५ व सन २०१५-१६ करीता नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.** | **<u>प्रस्तावाचा निर्णय :-</u>** वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दलित वस्ती योजनेतून मंजूर अनुदानातून विकास कामाच्या वरिलप्रमाणेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस व त्यावरील होणारा ज्यादा खर्च म.न.पा.निधीतून करणेस ही सभा मान्यता देत आहे. वरील सर्व कामास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - सुदेश चौधरी सुचक - रुपेश सुदाम जाधव<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १४ | **स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहरातील उघड्यावर शौच करण्याची प्रथा बंद करण्यासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रात योजना राबविणेबाबतचा प्रस्ताव.** | **<u>ठरावाचा निर्णय</u> :-** ' स्वच्छ महाराष्ट्र अभियान' ही योजना महानगरपालिका हद्दीमध्ये सर्वत्र लागु करणेत यावी. यामध्ये सद्यस्थितीस सर्वेक्षणाअंती पात्र लाभार्थी व वेळोवळी सर्वेक्षणाअंती वाढ होणाऱ्या पात्र लाभार्थ्यांस वैयक्तिक, गट, सामुदायिक, शौचालय बांधणेसाठी केंद्र व राज्य शासनाच्या देय्य अनुदानाव्यतिरिक्त शौचालय बांधणेसाठी येणाऱ्या अतिरिक्त खर्चाला रु.६०००/- अथवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चा मधील जे कमी असेल तीतके प्रती लाभार्थी कुटुंब महानगरपालिकेने निधी उपलब्ध करुन दयावा. योजना राबणिसाठी आवश्यक ती जनजागृती करावी. सदर योजना १००% यशस्वी करणेसाठी येणाऱ्या खर्चाची दरवर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये तरतुद करावी. व वेळोवेळी येणाऱ्या प्रस्तावांवर मा. महापौर महोदय यांचे सल्ल्याने तसेच स्थायी समितीच्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेने अनुषंगिक सर्व कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना देणेत येत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | | या सर्व कार्यवाहीस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - भरत मकवाना सुचक - रमेश घोरकना<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १५ | **कृषी उत्पन्न बाजार समिती व वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी मेळावा आयोजित करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** उपरोक्त विषयाबाबत सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. कृषी उत्पन्न बाजार समिती वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने विवा कॉलेज विरार येथे शेतकरी मेळावा आयोजित करणेस व येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १६ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दितील शेतकऱ्यांसाठी विविध प्रकारची रोपे शासन व खाजगी रोपवाटिकेमधुन उपलब्ध करून देणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबत.** | **ठराव :-** उपरोक्त विषयाबाबत सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील शेतकऱ्यांसाठी विविध प्रकारची रोपे शासकीय रोपवाटीकेतून खरेदी करणेस व इतर आवश्यक रोपे खाजगी रोपवाटीकेमधून ई-निविदा प्रक्रीया करुन खरेदी करण्यास व शेतकऱ्यांना विनामुल्य वाटप करण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - नरेंद्र पाटील सुचक - रमेश घोरकना<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १७ | **राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्षेत्रिय विकास कार्यक्रम राबविणे.** | **<u>प्रस्तावाचा निर्णय :-</u>** वरील प्रमाणे नमुद केलेले काम अल्पसंख्याक बहूल नागरी क्षेत्रात मुलभूत सुविधा अनुदान योजना अंतर्गत करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. यासाठी होणारा खर्च प्राप्त अनुदानातून मागवण्यात यावा व अतिरिक्त खर्च महानगरपालिका फंडातून करण्यात यावा असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक - समिर जिकर डबरे सुचक - चंद्रकांत गोरीवले<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १८ | **चुळणे येथे पोलीस चौकीसाठी जागा उपलब्ध करून देणेकामी महानगरपालिकेचा नाहरकत दाखला देणेबाबत.** | **<u>ठराव/निर्णय :-</u>** वरील प्रस्तावाप्रमाणे माणिकपूर स्टेशन यांनी मागणी केल्याप्रमाणे मौजे- चुळणे येथिल स.नं-१९७ ब मधिल पाण्याच्या टाकीचे (ESR) आरक्षण (क्षेत्र-९३४ चौ.मी) रद्द करुन त्याऐवजी नविन आरक्षण क्षेत्रिय पोलिस ठाणे प्रस्तावीत करणेसाठी (नकाशा क्र.VVCMC/MOD.No.०३, २०१५-१६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) वसई-विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामध्ये बदल करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस तसेच सध्या महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले आरक्षित क्षेत्र (५४२.९१ चौ.मी) नविन प्रस्तावित क्षेत्रीय पोलिस ठाणे आरक्षणासाठी पोलिस खात्याला महानगरपालिकेकडुन उपलब्ध करुन देणे व त्या आरक्षणाप्रमाणे विकसीत करणेसाठी महानगरपालिकेचा ना-हरकत दाखला देणेंस प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक - वृंदेश पाटील सुचक - फ्रॅंक डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १९ | **वसई-विरार शहर महानगरपालिका संपुर्ण** | **ठराव/निर्णय :-** उपरोक्त प्रस्तावांवर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात विविध धार्मिक |

| | | |
|---|---|---|
| | **क्षेत्रात विविध प्रकारचे साजरे होणाऱ्या उत्सवांच्या वेळी रस्त्यावर उभारण्यांत येणाऱ्या मंडप/स्टेज यामुळे रहदारीस अडथळा न होऊ देणे तसेच ध्वनी प्रदुषणाबाबत नागरीकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी प्रभावीरित्या सुविधा उपलब्ध करणेसाठी शासन नियम, शासन निर्णय, न्यायालयीन आदेश, शासन परिपत्रकानुसार सन २०१५ साठी निश्चित करावयाचे प्रारूप मार्गदर्शक तत्वांना मान्यता मिळणेबाबत.** | उत्सव, कार्यक्रम व समारंभ साजरे होत असतात या निमित्ताने विविध मंडळे रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणी तातपुरते मंडप/स्टेज उभारणी करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत अर्ज करतात अशावेळी बहुतेक मंडळे वाहतुकीच्या रस्त्यावर मंडप/स्टेज उभारणी करतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होता. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व नागरिकांना कमीत कमी त्रास व्हावा, त्याचप्रमाणे (ध्वनी प्रदुषण नियंत्रण व नियमन) नियम २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेही आवश्यक आहे. यासाठी मा.उच्च न्यायालय यांचे आदेश, शासन नियम, शासन निर्णय व शासनाने दि.०१/०७/२०१५ व दि.०६/०७/२०१५ अन्वये परिपत्रकानुसार केलेले सुचनेनुसार तयार करण्यात आलेले प्रारुप मार्गदर्शक तत्त्वांना ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे तथापि शहरातील मा.महापौर मेरार्थॉन स्पर्धा त्या सदृष्य स्पर्धा/समारंभ याकरिता अपवाद राहतील. व सदर तत्वांची महानगरपालिका क्षेत्रात अंमलबजावणी करणेस व व्यापक प्रसिद्धी करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - चंद्रकांत गोरिवले सुचक - भरत मकवाना<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २० | **वसई-विरार शहर महानगरपालिका मौजे गास, दिवाणमान, चुळणे, गिरीज व आचोळे येथील मिठागर (salt pan) च्या शासकीय जागेवर विविध प्रयोजनार्थ आरक्षणे प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये करावयाच्या कार्यवाही बाबत.** | <u>**ठराव/निर्णय :-**</u> याकामी मंजूर विकास आराखडयामध्ये (नकाशा क्र.MOD No.४/२०१५-१६ मध्ये दर्शविल्या प्रमाणे) खालील काही नविन बाबींचा अंतर्भाव करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम-१९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे व याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. याकामी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करणेंत यावी.<br>वरिल प्रस्तावामध्ये नमुद केलेली नविन आरक्षणे मंजूर विकास आराखडयामध्ये प्रस्तावित करण्यासाठी सदर ठिकाणी मंजूर विकास आरखडयामध्ये विशेष विकास क्षेत्र (Special Development Zone) प्रस्तावित करणे (नकाशा क्र. MOD No.८/२०१५-१६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सदर विशेष विकास क्षेत्रासाठी (Special Development Zone) विकास क्षेत्र म्हणुन तरतुद ठेवणे.<br>विशेष विकास क्षेत्रालगत असलेल्या मौजे-आचोळे येथिल रेल्वे लाईनच्या पश्चिम बाजुला लागुन आरक्षण क्र.४०६ पासून मौजे-दिवाणमान येथिल स.नं-५७ व ५८ मध्ये १२ मीटर (नकाशा क्र. MOD No.८/२०१५-१६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) रुंदीचा रस्ता प्रस्तावित करणे.<br>**प्रस्तावाच्या बाजुने - १०७ प्रस्तावाच्या विरोधात - ६ तटस्थ :- ०**<br>अनुमोदक - संदिप पाटील सुचक - अब्दुल हक सुलेमान पटेल<br>ठराव बहुमताने मंजुर |
| २१ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्यातील रिंग रूट व इतर प्रयोजनार्थ आरक्षित खाजगी जागा भुसंपादित करणेकामी वाटाघाटी करून मोबदला संबंधितांस हस्तांतरणीय विकास** | <u>**ठराव/निर्णय :-**</u> वरिल प्रस्तावानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये सार्वजनिक प्रयोजनाकरिता आवश्यक असलेली जमिन संपादीत करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये खालील नमुद केलेल्या पर्याया प्रमाणे कार्यवाही करणेस तसेच भूसंपादन करणेकामी येणा-या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>अ) परस्पर संमत होईल अशी रक्कम भरुन कराराद्वारे, किंवा |

| | | |
|---|---|---|
| | **हक्क (TDR) व अनुज्ञेय इतर मोबदला देणेबाबत.** | ब) अशा रक्कमेऐंवजी, नियोजन प्राधिकरणाने भूमी संपादन अधिनियम १८९४ यामध्ये नमुद करण्यांत आलेल्या तत्वाच्या आधारे निश्चित करावयाच्या पट्टाकाराच्या हित सबंधाच्या मुल्या इतकी रक्कम पट्टेदाराने पट्टाकाराला देण्याच्या किंवा ती रक्कम पट्टाकाराला देण्यासाठी उक्त संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे ठेव म्हणुन ठेवण्याच्या शर्तीस अधिन राहून जमिन मालकाला किंवा पट्टेदाराला विनामुल्य व सर्व भारांपासून मुक्त स्थितीत स्वाधिन करण्यांत आलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळादाखल तळजमिन निर्देशांक (FSI) किंवा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) आणि तसेच , या सबंधात तयार करण्यांत आलेल्या अंतिम विकास नियंत्रण विनियमांमध्ये तरतुद केल्याप्रमाणे स्वाधिन करण्यांत आलेल्या जमिनीवर त्याच्या खर्चाने करण्यांत आलेल्या सुखसोयींच्या विकासादाखल किंवा बांधकामादाखल आणखी अतिरीक्त तळजमिन निर्देशांक किंवा हस्तांतरणीय विकास हक्क देऊन किंवा<br>क) भूमी संपादन अधिनियम, १८९४ या अन्वये अशी जमिन संपादन करण्यासाठी राज्य शासनाकडे अर्ज करुन सदर जमिन संपादन करता येईल आणि करार करुन किंवा या कलमान्वये तळजमिन निर्देशांक (FSI) किंवा अतिरीक्त तळजमिन निर्देशांक किंवा हस्तांतणीय विकास हक्क (TDR) देऊन किंवा यथास्थिती भूमी संपादन अधिनियम, १८९४ या अन्वये अशा प्रकारे संपादन केलेली जमिन सर्व भारांपासून मुक्त अशी, नियोजन प्राधिकरणाकडे निहीत होईल.<br>अनुमोदक - चंद्रकांत गोरिवले सुचक - वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २२ | **दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या गोविंदा पथकासाठी अपघाती विमा योजनेचा लाभ देणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णयः-** वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानुसार सदर कार्यक्रमाकरीता महानगरपालिका हद्दीतील अंदाजे १०० नोंदणीकृत पथकातील अंदाजे ७,००० सहकाऱ्यांचा तात्पुरत्या अपघाती विमा उतरविणेकरीता अंदाजे रक्कम रू. ३० रु. हप्ता (प्रिमीयम) या प्रमाणे अंदाजे ७,००० सदस्याचां विमा सुरू करणेकरीता अंदाजे रू. २,१०,०००/- (दोन लक्ष दहा हजार रुपये) खर्च येणार आहे. सदरील विमा मागील वर्षी प्रमाणे दि. ओरियन्टल इन्शुरन्स कंपनी यांच्या मार्फत करण्यात येईल.<br>सबब कार्यक्रमाच्या नोंदणी करिता महापालिकेमार्फत जाहिर सुचना अथवा शहरात जाहीर आव्हान करण्यात येणार आहे.<br>सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात सत्कार उत्सव समारंभ व्याख्यानमाला वक्तृत्वस्पर्धा ग्रंथसंमेलन विद्यार्थी गुणगौरव गुणवंत शिक्षक सत्कार व्यक्ती संस्थासाठी महापालिका भुषण पुरस्कार व महापौर चषक स्पर्धा व इतर सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रम या लेखाशिर्षका अंतर्गत २,००,००,०००/- (रूपये दोन कोटी मात्र) रक्कम रू. तरतुद करण्यांत आलेली आहे.<br>त्यानुसार सदर कार्यक्रम राबविणे व त्या करिता येणाऱ्या खर्चास आजची सर्वसाधारण सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - वृंदेश पाटील सुचक - पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २३ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत ५ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१५ चे यशस्वी आयोजन करण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी** | **प्रस्तावाचा ठराव/निर्णय-** वरील विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली, त्यानुसार महापौर मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यांसाठी परवानगीची आवश्यकता असल्याने ॲथलेटिक्स फेडेरेशन ऑफ इंडिया(दिल्ली),ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटना(ठाणे), महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटना (पुणे) तसेच पालघर जिल्हा ॲथलेटिक्स संघटना अशा ठिकाणी परवानगी करिता तसेच मॅरेथॉन स्पर्धेच्या सभांकरिता जाणे येणेसाठी व महापौर मॅरेथॉन स्पर्धेचे कामकाज यशस्वीरित्या पुर्ण करणेसाठी समन्वयकांची आवश्यकता असल्याने वसई तालुका कला क्रीडा मंडळाचे सरचिटणीस श्री.प्रकाश वनमाळी व माजी स्थायी समिती सभापती |

| | | |
|---|---|---|
| | **मिळणेबाबत.** | श्री.संदेश जाधव यांची महापौर मॅरेथॉन स्पर्धेच्या समन्वयक म्हणून नेमणूक करणेंस याद्वारे मान्यता देण्यांत येत आहे.याबाबतचे महानगरपालिकेचे पत्र श्री.प्रकाश वनमाळी,सरचिटणीस वसई तालुका कला क्रीडा मंडळ व माजी स्थायी समिती सभापती श्री.संदेश जाधव यांना तात्काळ देण्यांत यावे.<br>मॅरेथॉन स्पर्धेकरिता ॲथलेटिक्स फेडेरेशन ऑफ इंडिया(दिल्ली),ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटना(ठाणे), महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटना (पुणे), पालघर जिल्हा ॲथलेटिक्स संघटना या प्राधिकरणांच्या परवानगींची आवश्यक्ता असल्याने संबंधीत प्राधिकरणाचे परवानगी शुल्क त्यांना तात्काळ अदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>मॅरेथॉन स्पर्धेच्या आयोजनासाठी वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळ यांची मदत घेणे, स्पर्धेचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने प्रायोजक मिळविणे व स्पर्धेचे उत्तम प्रकारे नियोजन करण्याच्या हेतुने इव्हेंट मॅनेजमेंट कडे सदर काम सोपविणेकामी मान्यता देणेंत येत आहे.<br>मॅरेथॉन स्पर्धेवरील खर्च कमी करण्याच्या दृष्टीने या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त प्रायोजक मिळविणेसाठी मे.आर्यन झेड स्पोर्ट ॲण्ड पीआर,गोरेगाव यांना पत्र देण्यांत यावे, व याबाबत संबंधीत मे.आर्यन झेड स्पोर्ट ॲण्ड पीआर यांचेशी योग्य ती कार्यालयीन आगाऊ स्वरुपात पुर्तता करण्यांत यावी.<br>वसई विरार शहर महानगरपालिका च्महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१५छ च्या आयोजनासह अनुषंगीक सर्व प्रकारच्या कार्यवाही करणेकरिता येणाऱ्या रु.२ कोटी पर्यंतच्या खर्चास आजची सर्वसाधारण सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - नितीन राऊत सुचक - पंकज ठाकूर<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |